३. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०३.०९.२०२४ रोजी अपिलार्थींना कळविले की, आपण आपल्या अर्जात नमुद केल्याप्रमाणे सन २०२१ ते आजतागायत. उप अभियंता -२ यांच्या उपविभाग अंतर्गत येणाऱ्या १६५- अंधेरी (प), १६६-अंधेरी (पू), १७६- बांद्रा (प), विधानसभा मतदार संघातून आमदार, खासदार निधीतून झालेल्या कामांची माहिती मागितलेली आहे. खासदार फंडाची कामे या उपविभागतून करण्यात येत नाही.

आपणांस कळविण्यात येते की, आपण मागितलेली माहिती ही विस्तृत स्वरूपाची असून विविध नस्तीमध्ये विखुरलेली आहे. सदर बाब लक्षात घेता आपणांस माहिती देण्यासाठी सर्व कामे बाजूला सारून माहिती गोळा करावी लागेल. महाराष्ट्र माहितीचा अधिकार (सुधारित) विषय २०१२ दि. १६.०१.२०१२ च्या अधिसुचणेप्रमाणे अधिनियमाच्या कलम ६ अन्वये माहिती मिळण्यासाठीचा लेखी विनंती अर्ज एकाच विषयासंबंधी / कामासंबंधी देण्यात यावा, अर्जदाराला एकापेक्षा अधिक विषयाची माहिती हवी असेल तर त्याकरीता स्वतंत्र अर्ज करणे अपेक्षित आहे. जेणेकरून त्या त्या कामानुसार /विषयानुसार आपणांस माहिती उपलब्ध करून देता येईल. आपणांस कळविण्यात येते की, सदर मंजूर कामे जिल्हाधिकरी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्या (www.mumbaisuburban.gov.in) या वेबसाईटवर उपलब्ध आहे करीता आपण उपरोक्त वेबसाईटवरून माहिती उपलब्ध करून घ्यावी व त्यानंतर आपणांस कोणत्या कामांची माहिती हवी आहे त्या त्या कामानुसार / विषयानुसार स्वतंत्र अर्ज करून या उपविभागास कळवावे जेणेकरून आपणांस त्या त्या कामानुसार / विषयानुसार माहिती देणे शक्य होईल.

अपिलार्थींचे समाधान न झाल्याने अपिलार्थींनी दि. १०.०९.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले.

४. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. १३.०१.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, अपिलार्थींनी विचारलेली माहिती विस्तृत स्वरूपाची असून विविध नस्तीमध्ये विखुरलेली होती. त्यामध्ये जवळपास ४०० पेक्षा जास्त कामांचा समावेश आहे. म्हणून दि. ०३.०९.२०२४ रोजी अपिलार्थींना कळविले की, प्रशासकीय मान्यतेचे आदेश जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे व स्वतंत्र अर्ज केल्यास ठराविक कामांची माहिती देण्यात येईल. परंतु, अपिलार्थींनी तसे न करता प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि. २९.१०.२०२४ रोजी अपिलकर्त्यांनी प्रशासकीय मंजूरीच्या कामांची यादी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्या www.mumbaisuburban.gov.in या वेबसाईटवरुन प्राप्त करुन घ्यावी व त्यांना हवी असलेल्या कामांच्या माहिती बाबत काम निहाय स्वतंत्र अर्ज करावा व जनमाहिती अधिकारी यांनी सदर अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जदारास लवकरात लवकर माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेशित केले होते.

जन माहिती अधिकारी यांनी असेही सादर केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतर दि. ०९.१२.२०२५ रोजी अर्जदाराने या कार्यालयात भेट देऊन नस्तीचे निरीक्षण केले व माहिती प्राप्त करून घेतली. सदर माहितीद्वारे आपले पूर्ण समाधान झाले आहे. त्याअनुषंगाने पूर्वी देण्यात आलेले माहिती अर्ज, अपिल अर्ज व तक्रार अर्ज निकाली काढण्यात यावे अशी विनंती पत्राद्वारे केली. सदर प्रकरणी अर्जदाराने विस्तृत स्वरुपाची माहिती विचारली होती. परंतु त्यांना शासकिय नियम समजावुन सांगुन उपलब्ध माहिती

..३/-

